# <u>हस्तपुस्तिका क्र.०८</u>

**निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये अवलंबिली जाणारी पद्धतः-**

या खात्याकडे थेट तक्रारी प्राप्त झाल्यास त्या पुढील कार्यवाहीकरिता संबंधित खातेप्रमुख / उप आयुक्त / सह आयुक्त यांना अग्रेषित केल्या जातात.

एखाद्या प्रकरणात प्राथमिक चौकशी / तपास करण्याचे आदेश संबंधित खाते प्रमुख / उप आयुक्त / सह आयुक्त / अतिरिक्त आयुक्त / मा.महानगरपालिका आयुक्त यांचेकडून प्राप्त झाल्यास या प्रकरणी चौकशी करून अहवाल परिपत्रक क्र.एमपीएम/दोन/७७०२ दि.०२.०४.२०१६ नुसार सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांकडे आदेशार्थ सादर केले जातात. संबंधित सक्षम अधिकाऱ्यांचे आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही / खात्यांतर्गत चौकशी करण्यात येते.

ज्या प्रकरणात खात्यांतर्गत चौकशीचे आदेश दिले जातात, त्या प्रकरणात बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (शिस्त व अपील), नियम २०१५ मधील नियम आणि बृहन्मुंबई म्हानगपालिका, प्रमुख अधिकारी (चौकशी) खाते, खात्यांतर्गत चौकशी हस्तपुस्तिका, २०१८ मधील नियमांनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मंजूरीने योग्य ती कार्यवाही करण्यात येते. त्याअंतर्गत अहवाल परिपत्रक क्र.एमपीएम/दोन/७७०२ दि.०२.०४.२०१६ नुसार सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांकडे आदेशार्थ सादर केले जातात. संबंधित सक्षम अधिकाऱ्यांचे आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही (शिक्षादेश तयार करून बजाविण्याकरिता संबंधित कार्यालय प्रमुखांकडे पाठविणे इतपत) करण्यात येते.

एखाद्या कर्मचाऱ्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून लाच मागणी प्रकरणी अटक केल्यास त्यास महानगरपालिका सेवा नियमावली मधील नियम क्र.८० मधील तरतूदीनुसार निलंबित करण्याबाबतची कार्यवाही करण्याकरिता परिपत्रक क्र.एमपीएम/दोन/७७०२ दि.०२.०४.२०१६ मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याना प्रस्ताव सादर करण्यात येतो व त्यानुसार व तदअनुषंगिक पुढील कार्यवाही करण्यात येते/त्याबाबत संबंधित कार्यालय प्रमुखाना कळविण्यात येते.

एखाद्या प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम १७(अ) किंवा १९(१) अन्वये अनुक्रमे तपासास मान्यता किंवा अभियोग दाखल करण्यास परवानगीबाबत पत्रव्यवहार प्राप्त झाला, तर त्याअनुषंगाने अनुक्रमे संबंधित सक्षम अधिकारी किंवा मा.महानगरपालिका आयुक्त यांना प्रकरण सादर केले जाते त्याबाबतचा निर्णय लाचलुचपत प्रतिबंधक विभागास विहित वेळेत कळविण्यात येतो.(सदर बाबतची कार्यवाही अनुक्रमे संबंधित खाते किंवा प्रमुख अधिकारी (चौकशी) खाते यांनी करावयाची असते.)

एखाद्या कर्मचाऱ्यास पोलिसांकडून फौजदारी गुन्हा प्रकरणी अटक केल्यास त्यास महानगरपालिका सेवा नियमावली मधील नियम क्र.८० मधील तरतूदीनुसार निलंबित करण्याबाबतची व तदअनुषंगिक पुढील कार्यवाही परिपत्रक क्र.एमपीएम/दोन/७७०२ दि.०२.०४.२०१६ मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी करावयाची असते.

एखाद्या प्रकरणात पोलीस खात्याकडून भा.दं.वि.कलम १९७ अन्वये मा.न्यायालयात दोषारोप दाखल करण्यास परवानगी मिळण्याबाबत पत्रव्यवहार प्राप्त झाला, तर सदर पत्रव्यवहार उचित कार्यवाहीकरिता संबंधित खाते प्रमुख/सक्षम अधिकारी/ मा.महानगरपालिका आयुक्त यांना सादर करण्यात येतो.

निलंबित कर्मचा-याच्या निलंबनाच्या पुनर्विलोकनासंदर्भातील तरतुदी परिपत्रक क्र.प्रअचौ/मुख्यालय /2055 दि.1.8.2019 मध्ये नमूद केलेल्या आहेत. सदर परिपत्रकामधील निर्देशानुसार निलंबित कर्मचा-याच्या निलंबनाची प्रकरणे निलंबनाच्या विशिष्ट कालावधीनंतर व संबंधितांकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर संबंधित पुनर्विलोकन समितीकडे निलंबनाच्या पुनर्विलोकनासाठी सादर केली जातात व संबंधित कार्यालय प्रमुखांना पुनर्विलोकन समितीचा निर्णय कळविण्यात येतो व त्यानंतर त्यानुसार संबंधित कार्यालय प्रमुखांनी सक्षम अधिका-यांच्या मंजूरीने/ मान्यतेने आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी करावयाची असते.

सही/- दि.१४.०५.२०२०

प्रमुख अधिकारी (चौकशी) प्र.